अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
२९.०७.२०२६


# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

वर्ष: ०७ | अंक: १७९ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड


गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा




RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 8669533485

+91 7745067712


### राजापेठ उडडाणपूलावर भीषण अपघात

## डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार २ महिलांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***अमरावती*** – शहरातील राजापेठ भागातून बडनेऱ्याकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावर दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास एका भरधाव टीप्परने दोन महिलांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एक महिला जागीच ठार झाली, तर दुसऱ्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर शहरातील विस्कळीत वाहतूक व्यवस्था आणि जड वाहनांच्या बिनदिक्कत प्रवेशावरून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, गौरी प्रमोद धमार्ळे (वय २७, रा.बोरगाव धमार्ळे) आणि हर्षा आदेश गावंडे (वय ३९, रा.अमरावती) या दोन्ही महिला राजकमल भागातून दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास राजापेठ भागातून दुचाकीने पुढे बडनेरा रोडकडे जात होत्या. यादरम्यान, राजापेठ उड्डाणपुलाच्या अगदी कॉर्नरवर



एका ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एक दुचाकीस्वार महिला जागीच ठार झाली, तर दुसऱ्या महिलेचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. विशेष म्हणजे, यातील एका महिलेने डोक्यात हेल्मेट घातलेले होते, परंतु अपघाताच्या तीव्रतेमुळे हेल्मेटमध्येच तिचे डोके चिरडल्याची प्राथमिक माहिती घटना समोर आली आहे. घडल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. त्यातच पाऊस सुरू असल्यामुळे उड्डाणपुलावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून बाहतुकीची मोठी कोंडी झाली. भीषण बाब म्हणजे, अपघात घडल्यानंतर ट्रकचालकाने घटनास्थळावरून पोबारा केला. संबंधित ट्रकला नंबर प्लेट नसल्यामुळे चालकाचा व गाडीचा क्रमांक अद्याप निष्पन्न होऊ शकलेला नाही.

घटनेची माहिती मिळताच राजापेठचे ठाणेदार संदीप चव्हाण, वाहतूक पोलीस निरीक्षक निलेश गावंडे आणि वाहतूक एसीपी संजय खताळे यांनी तातडीने आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी व उपस्थित नागरिकांनी दोन्ही गंभीर जखमी महिलांना तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन रुग्णालय) दाखल केले.

## राहुल गांधींनी संसदेत मुर्खांची व्याख्या सांगितली

### अंधभक्तांच्या उल्लेखाने भाजप खासदार संतापले, लोकसभेत प्रचंड गोंधळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – या देशात तीन प्रकारचे लोक आहेत. एक म्हणजे विद्यार्थी, दुसरे म्हणजे मूर्ख आणि तिसऱ्या प्रकारात अंधभक्त येतात.

यापैकी मूर्ख आणि अंधभक्तांना आपल्याला सगळे माहिती आहे, आपण देव आहोत, याची खात्री असते, असे खोचक वक्तव्य लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केले. राहुल गांधी यांनी बुधवारी लोकसभेत पेपरफुटी दुरुस्ती विधेयकावर सुरु असलेल्या चर्चेत भाग घेतला.



यावेळी राहुल गांधी यांनी उपमा आणि रुपकांचा वापर करत सभागृहातील भाजप खासदारांना अक्षरशः जेरीस आणले. राहुल गांधी यांनी कोणाचाही उल्लेख न करता मूर्ख लोकांची लक्षणे सांगितली. यावर समोरच्या बाकांवर बसलेले भाजपचे खासदार प्रचंड संतापले आणि त्यांनी सभागृहात गोंधळ घालायला सुरुवात केली. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला सांगितले की, मी एका विद्यार्थिनीशी बोलत होतो. मी तिला विचारलं, तू विद्यार्थी आहेस म्हणजे नेमकी काय आहेस? त्यावर तिने सांगितले की, विद्यार्थी म्हणजे खुल्या विचारांची आणि मनाची असणारी व्यक्ती. या व्यक्तीला नवीन गोष्टी शिकण्याची जिज्ञासा असते.

मग मी त्या विद्यार्थिनीला विचारले की, दुसऱ्या प्रकारात कोणते लोक येतात? ती म्हणाली की, दुसऱ्या प्रकारात मूर्ख लोक येतात. त्यांना वाटतं, आपल्याला सगळं माहिती आहे, हे जग स्थिर आहे, सगळं ज्ञान आपल्याच आतून येतं, आपण देव आहोत असं त्यांना वाटतं, हे लोक उद्दाम असतात, ते इतरांचं ऐकत नाहीत, त्यांचं सत्य मान्य करत नाही. या लोकांना आपण मूर्ख म्हणतो. यानंतर तिसऱ्या प्रकारात अंधभक्त येतात. अंधभक्त असे लोक असतात जे मूर्खांना देव मानतात, असे राहुल गांधी यांनी म्हटले. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यावर भाजप खासदारांनी सभागृहात प्रचंड गोंधळ घातला. राहुल गांधी संसदीय भाषेत बोलत नाहीत, अशी तक्रार लोकसभा अध्यक्षांकडे केली. यावर लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांनी, तुम्ही विधेयकावरच बोला, बाकी गोष्टी बोलू नका, अशी सूचना राहुल गांधी यांना दिली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल गांधी वापरत असलेला 'मूर्ख' आणि 'अंधभक्त' हा शब्द असंसदीय असल्याचे सांगितले.

### थोडक्यात

#### गुरुपौर्णिमेनिमित्त अक्कलकोट मध्ये भाविकांचा महासागर : मंदिर प्रशासनाची जय्यत तयारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अक्कलकोट*** – श्री स्वामी समर्थांच्या पवित्र नगरी अक्कलकोटमध्ये गुरुपौर्णिमा उत्सवासाठी जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. बुधवार, २९ जुलै रोजी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, देशभरातून येणाऱ्या हजारो भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. गुरुपौर्णिमा हा श्री स्वामी समर्थ भक्तांसाठी अत्यंत श्रद्धेचा आणि भक्तीभावाचा दिवस मानला जातो. या दिवशी महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा, गुजरात, मध्य प्रदेश आणि देशाच्या विविध भागांतून हजारो भाविक अक्कलकोटमध्ये दाखल होतात.

### कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारत सुसाट!

## गुलवीरने रचला इतिहास, हरजिंदरनेही उंचावला तिरंगा, सहाव्या दिवशी अखेर पदकांची संख्या झाली डझनभर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***ग्लासगो***– स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी कायम आहे. स्पर्धेच्या सहाव्या दिवशी भारताच्या खात्यात आणखी दोन रौप्यपदकांची भर पडली. वेटलिफ्टिंगमध्ये हरजिंदर कौर आणि ॲथलेटिक्समध्ये गुलवीर सिंग यांनी रौप्यपदक जिंकत भारताची मान उंचावली. याशिवाय बॉक्सिंगमध्ये भारताचे किमान तीन पदके निश्चित झाली आहेत. या



दोन रौप्यपदकांमुळे भारताच्या एकूण पदकांची संख्या १२ वर पोहोचली असून पदकतालिकेत भारताने नववे स्थान गाठले आहे. भारताच्या खात्यात सध्या २ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३ कांस्य अशी एकूण १२ पदके जमा झाली आहेत.

हरजिंदर कौरची कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी महिलांच्या ६९ किलो वजनी गटातील वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारताच्या २९ वर्षीय हरजिंदर कौरने शानदार प्रदर्शन करत रौप्यपदक पटकावले. तिने स्नॅच आणि क्लीन अँड जर्क या दोन्ही प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत एकूण २२७ किलो वजन उचलले. स्नॅच फेरीत हरजिंदरने अनुक्रमे ९६ किलो, ९९ किलो आणि १०१ किलो वजन यशस्वीरीत्या उचलले. त्यानंतर क्लीन अँड जर्कमध्ये तिने १२० किलो, १२३ किलो आणि अखेरच्या प्रयत्नात १२६ किलो वजन उचलत एकूण १०१ + १२६ = २२७ किलो वजनाची नोंद केली.

ही कामगिरी तिच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम ठरली. या स्पर्धेत कॅनडाच्या शार्लेट सिमोन्यू हिने २३६ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले, तर ऑस्ट्रेलियाच्या फीबे हेमन हिने २१८ किलो वजनासह कांस्यपदक जिंकले.

गुलवीर सिंगचा ऐतिहासिक पराक्रम पुरुषांच्या १०,००० मीटर धावण्याच्या अंतिम शर्यतीत भारतीय धावपटू गुलवीर सिंग याने ऐतिहासिक कामगिरी करत रौप्यपदक जिंकले.

## तर भारतावर १०० टक्के शुल्काचे संकट!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – भारतावर आता १०० टक्के अमेरिकन शुल्काचे संकट घोंघावत आहे. अमेरिकन सिनेटमध्ये मंजूर झालेल्या विधेयकानुसार, रशियाकडून कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या जगातील पहिल्या पाच देशांवर १०० टक्के अतिरिक्त आयात शुल्क लादले जाऊ शकते.

भारत आणि चीन हे रशियाचे सर्वात मोठे ऊर्जा ग्राहक असल्याने भारताला याचा मोठा फटका बसू शकतो. या विधेयकातून रशियामधून अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर ५०० टक्के शुल्क आकारण्याचे व्यापक



अधिकार या विधेयकाद्वारे राष्ट्राध्यक्षांना मिळतील. अमेरिकन सिनेटमध्ये हे विधेयक ८६-१२ अशा मोठ्या बहुमताने प्राथमिक प्रक्रियेत मंजूर झाले आहे. मात्र, प्रतिनिधी गृहाच्या सुद्द्यांमुळे सप्टेंबर महिन्यापूर्वी याचे कायद्यात रूपांतर होण्याची शक्यता कमी आहे. युक्रेनकडून निर्णयाचे स्वागत दरम्यान, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनीही रशियावर आर्थिक दबाव वाढवण्यासाठी या निर्बंधांचे स्वागत केले आहे. हे विधेयक १९९६ च्या इराण निर्बंध कायद्याचा कालावधी २०३१ पर्यंत वाढवते, ज्यामुळे इराणसोबत व्यापार करणाऱ्या कंपन्यांवरही अमेरिकेला कारवाई करता येईल.

## दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग, अमित शाहनंतर सुनील तटकरेंनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. बड्या नेत्यांच्या गाडी भेटी सुरु असल्यानं राजकीय चर्चांना उधाण आले आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे खासदार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे. काल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर, आज तटकरेंनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेल्यानं विविध चर्चा सुरु झाल्या



आहेत.

एक दिवस आधीच सुनील तटकरेंनी घेतली होती अमित शाहंची भेट एक दिवस आधीच सुनील तटकरे यांनी अमित शाह यांची संसदेतील शहांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली होती. सुनील तटकरे यांच्यानंतर सुप्रिया सुळे यांनी देखील अमित शाह यांची भेट घेतली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एक होण्याबाबत सुरु असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर अमित शाह नरेंद्र मोदी यांच्या दोन्ही पक्षातील नेत्यांकडून घेतल्या जात असलेल्या बैठकाना विशेष महत्व आहे. सुनील तटकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या भेटीचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे.




### शेतकऱ्यांनो अजिबात काळजी करू नका

# २ लाख थकबाकी असलेल्या सर्वांची कर्जमाफी होणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पीक विमा योजनेच्या धोरणात कुठलाही बदल करण्यात येणार नसून जुने तेच धोरण यंदा देखील कायम राहणार आहे. अडचणी येऊ नये म्हणून या संदर्भात काम केलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फायद्याचं काम होईल, धोरणात कुठले ही बदल केले नाहीत. अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी



दिली आहे. तर राज्यातील ३१लाख प्रोत्साहन अनुदान लाभार्थी आहे. त्यातील १७ लाख लोकांपर्यंत कर्जमाफी देत आहोत. प्रोत्साहन अनुदान तिसऱ्या किंवा चौथ्या यादीत येईल. यात ५ लाख लोकांनी केवायसी झालेले आहे. त्यामुळे त्यांना रक्कम द्यायला कुठली ही अडचण येणार नाही अशी देखील माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील २३ लाख शेतकऱ्यांची प्रोत्साहन यादी आहे. त्यामुळे अजिबात काळजी करू नका. रक्कम कमी आली असली तरी वरची रक्कम राष्ट्रकृत बँक देणार असल्याचेही ते म्हणाले. खताच्या बाबतीत घाबरण्याची गरज नाही छत्रपती शिवाजी महाराज योजनेतील जे शेतकरी राहिले होते त्यांना रक्कम दिली जाईल. यात पात्र शेतकऱ्यांना त्यांची रक्कम मिळणार आहे. तसेच साखरेच्या भावात वाढ झाली आहे. त्याचा फायदा नक्की शेतकऱ्यांना होणार आहे. मराठवाड्यात कमी पाऊस पडत असून आतापर्यंत मराठवाडा विभागात ७७ टक्के पाऊस पडलाय. तर कोकणात पाऊस जास्त आहे. कोकणात पेरणी ८४ टक्के पेक्षा जास्त झाली आहे.



### अभिनव मित्र परिवार व गृप यांचे वतीने

# जरुड येथे विठ्ठल भक्तिगीत गायन स्पर्धा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**जरुड** – सालाबादाप्रमाणे याहीवर्षी स्थानिक अभिनव मित्र परिवार व गृप यांचे वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून विठ्ठल भक्ति गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या नियोजीत स्पर्धेमध्ये ४५ ग्रुप सदस्यांनी भाग घेतला होता. ज्यामध्ये अनेक प्रकारचे विठ्ठल भक्ति गीत गायन करण्यात आले. या गितांनी संपूर्ण परिसरात उत्साह, आनंद तसेच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ही स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आली होती.

या स्पर्धेचे १ हजार १ रुपयांचे प्रथम हेमंत टोंगसे, दुसरे पारितोषिक ७०१ रुपयांचे योगेश तुमराम तर ५०१ रुपयांचे तिसरे गजानन चव्हाण यांनी प्राप्त केले तर चौथे पारितोषिक ३०१ विजेते मोहन लांडगे महाराज तर पाचवे पारितोषिक २०१ राजेश वाडेकर यांनी तर प्रोत्साहनपर १०१ रुपयांचे वासुदेव वाडबुदे यांनी मिळविले. विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र व शिल्ड देण्यात आले.

या बक्षीस वितरण कार्यक्रमाला माजी सरपंच गणेश देशमुख, माजी उपसरपंच तथा माजी प्राचार्य उल्हास तडस, पुरवठा निरीक्षक प्रमोद दुधे, युवा उद्योजक राजेंद्र कुऱ्हाडे, उत्क्रांती शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त कर्मचारी शिवाजी वानखडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विष्णु राऊत तर आभार योगेश तुमराम यांनी मानले.

हा कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता हेमंत टोंगसे, भारत वसुले, दीपक होले, सचिन वानखडे, प्रशांत डकरे, हर्षल बिजवे, संजय काळबेंडे, तेजस सव्वालाखे, कैलास चरपे, अक्षय बेले, हितेश धर्मे, रिंकेश राजस, हर्षल मोरसकर, विजय मेश्राम, राजू वाडेकर, तायडे, सुधीर कांबळे, पवन दवंडे, योगेश बिसांद्रे, कृष्णा कळसकर, उमेश बाहे, तुलसीदास कळमकर यांनी अथक परिश्रम घेतले.

### शिव वाहतुक चालक-मालक सेनेचा जिल्ह्यातील

# गब्बर पठाण यांच्या नेतृत्वात पदाधिकाऱ्यांचा मेळावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शिव वाहतुक चालक–मालक सेनेचा अमरावती जिल्ह्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मेळावा महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष गब्बर पठाण यांच्या नेतृत्वात उत्साहात संपन्न झाला.



यावेळी माजी खासदार अनंत गुढे, उपनेते सुधीर सूर्यवंशी, महिला संपर्कप्रमुख सागर, सहसंपर्कप्रमुख प्रदीप बाजड, सहसंपर्कप्रमुख नाना नागमोते, जिल्हा समन्वयक नितीन तारेकर, जिल्हाप्रमुख पराग गुडधे, मनोज कडू, प्रफुल भोजने, महानगरप्रमुख धीरज निवास, महिला संघटक सृष्टी वाघमारे, जिल्हा संपर्कप्रमुख प्रतिभा बोप–शेट्टी, महानगरप्रमुख लक्ष्मी शर्मा, आशावरी देशमुख, अंकुश कवडकर, उमेश शहाणे, बाळा तळोळकर, माजी नगरसेवक पंजाबराव तायवाडे, नगरसेवक संजु गव्हाळे तसेच अमरावती जिल्ह्यातील आजी–माजी पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते. याप्रसंगी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शिव वाहतुक चालक–मालक सेनेच्या अमरावती जिल्हा नवनियुक्त पदाधिकारी यांची घोषणा करण्यात आली.

त्यामध्ये जिल्हाध्यक्ष म्हणुन इर्शाद अहमद, उपजिल्हाप्रमुख मोहम्मद इमरान, अमरावती महानगर शहराध्यक्ष फैयाज खान, भातकुली तालुकाध्यक्ष शेख रियाज, वरुड तालुकाध्यक्ष जाकिर नवाब, शहराध्यक्ष प्रशांत पांडे यांचा समावेश आहे.

शिव वाहतुक चालक–मालक सेनेच्या या मेळाव्यामुळे शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरुड शहर पदाधिकाऱ्यांची नुकतीच घोषणा

# शहराध्यक्ष शाम आजनकर तर युवा शहराध्यक्षपदी अमित देवते

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) च्या वरुड शहर पदाधिकाऱ्यांची नुकतीच घोषणा करण्यात आली असून त्यामध्ये शहराध्यक्ष शाम आजनकर, युवा शहराध्यक्ष अमित देवते तर महिला शहराध्यक्ष म्हणुन रसिका बरडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.





विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) ने रणशिंग फुंकत अचानक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. माजी आमदार देवेंद्र भुयार यांचे मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष विजय वडस्कर यांनी वरुड शहरातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नावाची घोषणा केली. त्यामध्ये वरुड शहराध्यक्ष शाम आजनकर, युवा शहराध्यक्ष अमित देवते तर महिला शहराध्यक्ष म्हणुन रसिका बरडे यांचा समावेश आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व अभिनंदन केल्या जात असून सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# हिमानी, निधीशा, अंशू यांनी गावाचे नाव उज्वल केले

### पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घोराड शाळेच्या ३ विद्यार्थ्यांचा घवघवीत यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा घोराड येथील इयत्ता पाचवीच्या हिमानी धुर्वे, निधीशा कुकडे, अंशू कर्णासे विद्यार्थ्यांनींनी नुकत्याच जाहीर झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवुन शाळेचे आणि गावाचे नाव उज्वल केले आहे.



यशस्वि विद्यार्थीनी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे गावातील सर्व मंडळी, ग्रामस्थ आणि शिक्षक वर्गाने अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापकांनी सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाने हे यश मिळवले आहे. शाळेतील सर्व शिक्षकांनीही विशेष मार्गदर्शन वर्ग घेऊन त्यांना तयार केले. त्यांच्या या यशामुळे पुढील विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळेल.

गावातील ज्येष्ठ नागरिकांनीही विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे या विद्यार्थ्यांना इयत्ता ६ ते १० वी पर्यंत आर्थिक मदत मिळणार आहे. शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग चौथा २०२६ या परीक्षेत पात्र विद्यार्थी, मुख्याध्यापिका, वर्गशिक्षिका किरण ठाकरे आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले तसेच निहाल सुखनंदन मऱ्हे हा विद्यार्थी पाचवी मधून शिष्यवृत्ती परीक्षामध्ये पात्र झाला.

या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य आणि पालकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

# ट्रेनी आयपीएस अधिकाऱ्यावर छेडछाड ब्लॅकमेलिंगचा गंभीर आरोप!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – तेलंगणातील हैदराबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पो–लीस अकादमी मधील एका प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकाऱ्याविरुद्ध एका महिला प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्याचा विनयभंग, मारहाण आणि ब्लॅकमेल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेच्या आरोपानुसार, आरोपीने तिला जबरदस्तीने त्याच्या खोलीत नेले, तिच्यावर



मारहाण केली, तिच्या संमतीशिवाय तिचा व्हिडिओ रेकॉर्ड केला आणि तो व्हिडिओ तिच्या पतीला पाठवला. या तक्रारीनंतर, अत्तापूर पो–लीस आरोपीचा शोध घेत आहेत. प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकाऱ्यावर पाच आरोप एफआयआरनुसार, महिला प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्याने आरोप केला आहे की, आरोपी तिला २३ जूनपासून व्हॉट्सअ‍ॅपवर अश्लील संदेश पाठवत होता. तो इतर प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसमोर तिच्याबद्दल अपमानजनक टिप्पणी करत असे आणि दुसऱ्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यासोबत तिचे प्रेमसंबंध असल्याचा खोटा आरोप करून तिला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असे.


# इच्छेनुसार देहदान करुन देण्यात आला शेवटचा निरोप

### संत एकनाथ देवस्थानचे सेवेकरी प्रभाकर जोशी यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

ब्राम्हणपुरी परिसरातील रहिवासी, संत एकनाथ देवस्थानचे श्रद्धाळू सेवेकरी आणि सर्वांचे आदरस्थान असलेले प्रभाकर केशवराव जोशी यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. २४ जुलैच्या रात्री १० वाजेच्या सुमारास त्यांनी अंतिम श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संपूर्ण



वरूड शहरावर आणि वारकरी संप्रदायावर शोककळा पसरली आहे.

प्रेमाचा आणि सेवेचा आदर्श अत्यंत मृदूभाषी, नम्र आणि वारकरी परंपरेचे निष्ठावंत पाईक म्हणुन प्रभाकर जोशी यांची ओळख होती. वाढत्या वयानुसार गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी भगवंताचे नामस्मरण आणि सेवाभाव जपला.

त्यांचे वडील स्व.केशवराव जोशी यांनी संत एकनाथ देवस्थानमध्ये अनेक वर्षे अखंड सेवा दिली होती. वडिलांचा हाच वारसा पुढे चालवत प्रभाकररावांनी आयुष्यभर देवस्थानच्या कार्यात मोलाचे सहकार्य केले. जोशी कुटुंबाचे पैठण येथील संत एकनाथ महाराजांच्या घराण्याशी अत्यंत आपुलकीचे व श्रद्धेचे संबंध होते. याच ऋणानुबंधामुळे पैठण येथील संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प.वसंत महाराज पैठणकर दरवर्षी आवर्जून वरूड येथे जोशी कुटुंबियांच्या भेटीस येत असत.

देहदानाचा संकल्प केला पूर्ण जीवनात सेवेचा ध्यास घेतलेल्या प्रभाकर यांनी मृत्यूनंतरही समाजासाठी उपयोगी पडण्याचा महान विचार जपला होता.

त्यांनी हयात असतानाच देहदानाचा संकल्प केला होता. आपल्या आजोबांची ही अंतिम इच्छा पूर्ण करत, त्यांचे नातू सुमेश श्रीपाद जोशी व कुटुंबीयांनी २५ जुलै रोजी अत्यंत सन्मानपूर्वक प्रभाकरराव जोशी यांचा देह अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाकडे सुपुर्द केला.

# संपादकीय

**स्वत:ला घडवण्यात इतके गुंतून जा की इतरांच्या चुका शोधायला वेळच उरु नये**

## समृद्ध शेतकरी, सक्षम महाराष्ट्र

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी आजही अनेक संकटांशी दोन हात करत आहे. महाराष्ट्रातील बळीराजाने नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, वाढते उत्पादनखर्च, अस्थिर बाजारभाव आणि कर्जाचा डोंगर अशा अनेक समस्यांचा सामना करत शेती टिकवून ठेवली आहे. अन्नदाता म्हणून देशाला पोसणाऱ्या या बळीराजाच्या आयुष्यात मात्र स्थैर्य आणि समृद्धी अद्यापही दूरच आहे. त्यामुळे शेतकऱ्याला केवळ तात्पुरता दिलासा नव्हे, तर शेतीला नवी उभारी देणारे दीर्घकालीन धोरण आणि गरजूंना न्याय्य पद्धतीने दिलासा देणारी कर्जमाफी यांची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्रातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. हवामानातील अनिश्चितता दिवसेंदिवस वाढत असून पावसाचे बदलते स्वरूप शेतीसाठी मोठे आव्हान बनले आहे. एका बाजूला पाऊस नाही, तर दुसऱ्या बाजूला अतिवृष्टीमुळे उभे पीक वाहून जाते. अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या हातात उत्पन्नाऐवजी नुकसानच उरते. त्यातच बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज आणि सिंचनाचा वाढता खर्च शेतकऱ्याचे आर्थिक गणित अधिकच बिघडवतो. शेतीला नवी उभारी देण्यासाठी केवळ कर्जमाफी हा एकमेव उपाय ठरू शकत नाही. त्यासाठी सिंचनाची मजबूत व्यवस्था, जलसंधारण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, दर्जेदार बियाण्यांचा पुरवठा, मृदापरीक्षण, शेतीमालावर प्रक्रिया उद्योग, शीतगृहांची उभारणी, साठवण सुविधा आणि बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच यावर भर देणे आवश्यक आहे. शेती उत्पादनाला योग्य भाव मिळाल्यास शेतकरी आत्मनिर्भर होऊ शकतो. त्यासाठी हमीभाव व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी आणि बाजारव्यवस्थेतील पारदर्शकता महत्त्वाची आहे. कर्जमाफीचा प्रश्न हा अनेक वर्षांपासून चर्चेचा विषय आहे. पीक हातचे गेल्यानंतर किंवा बाजारभाव कोसळल्यानंतर शेतकऱ्याला कर्जाचा हप्ता भरणे अशक्य होते. अशावेळी तो सावकार किंवा बँकांच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबला जातो. त्यामुळे गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी न्याय्य, पारदर्शक आणि परिणामकारक कर्जमाफीची अंमलबजावणी आवश्यक आहे. मात्र, त्याचबरोबर भविष्यात पुन्हा कर्जबाजारी होणार नाही, अशी आर्थिक रचना उभी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अलीकडच्या काळात महाराष्ट्र शासनाने शेतकरी कर्जमुक्ती योजनांसाठी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया लागू केली असून पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचवण्यावर भर दिला जात आहे. कर्जमाफीबरोबरच पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. अनेकदा नुकसान होऊनही भरपाई वेळेवर मिळत नाही किंवा प्रक्रिया गुंतागुंतीची ठरते. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारदर्शक पंचनामे, जलद नुकसानभरपाई आणि शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्याचा शासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. आजचा शेतकरी केवळ पारंपरिक शेतीत मर्यादित राहू इच्छित नाही. फळबागा, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, सेंद्रिय शेती, मूल्यवर्धित प्रक्रिया उद्योग आणि कृषी पर्यटन यांसारख्या पूरक व्यवसायांना चालना दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळू शकते. त्यासाठी प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

# 'सदभावे नमस्कारीला, आडकुजी गुरूस्थानी!'

**'जसा जीवेचि मंत्र धरिला!**
**न कळे कोणी वरदहस्त ठेविला!**
**परि सद्भभावे मी नमस्कारीला!**
**आडकोजी गुरूस्थानी!!**


ग्रामगीता युगग्रंथाता आत्मानुभव या सदतिसाव्या अध्यायात खुद्द विश्वसंत श्री तुकडोजी महाराजांनी प्रगट केले आहे. पूर्वीच्या प्राचीन काळापासून गुरू परंपरा चालतं आलेली आहे. गुरूपौणिमेला व्यास पुजा म्हणून उल्लेख केला जातो. सद्गुरूच्या कृपेशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होऊ शकतं नाही, त्यामुळे विसाव्या शतकाच्या पुर्वाधीत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांना सुध्दा कुठे तरी लिन व्हावे लागले. राष्ट्संताचे नामकरण सोहळ्याला आलेल्या माधानचे श्रीसंत गुलाबराव महाराज हजर असतांना आकोटच्या हरि बुवांनी म्हटल्यावर सुध्दा वरदहस्त संपूर्ण कुटुंबांवर असल्याने आणि स्वतः सद्गुरूच्या दिव्य दृष्टीमुळे परमहंस स्थितीला पोहचलेले शतायुषी आडकुजी महाराजांना गुरुस्थानी मानले.

याला कारण 'आडकुजी चरणाने किती तरले, पुढेही तरतील, कलियुगे हाची धर्म, तरेल तो पदीच धुळीच लावील! 'ही संत परंपराच अशी आहे की, आदीनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, माऊली ज्ञानेश्वर महाराजांची संत परंपरा आर्वीच्या संत मायबाई पर्यंत आली आणि संत मायबाईच्या कृपेने ''मायबाईका पुरा पसारा, एक पल में हो आडकुजी तारा, जिन्होनें सब नाम उध्दारा, किया जगतको उतराई! 'त्यामुळे भगवान पांडुरंगाच्या मांदियाळी मध्ये आडकुजी महाराज, गजानन महाराज, साईबाबा, धुनीवाले बाबा, ताजुदिन बाबा, मुंगसाजी महाराज, खटेश्वर महाराज, मायबाई या सातही बंधूंच्या संत कार्याचे महिपती सर्वांचे शिष्यप्रवर किंवा एकमेव जागतिक किर्तीचे प्रचारक म्हणून युगप्रवर्तक राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचे स्थान उच्च दर्जाचे आहे.. ते राष्ट्रसंतानी आपल्या भजनमाला व अभंगवाणी व संत साहित्यातून सिध्द केलेले आहे.

याला कारणं परमहंस श्रीसमर्थ सद्गुरू आडकुजी महाराजांचा सहवास या 'शिरडीत बंधू माझा, म्हणे आडकुजी, दुजा भाऊ शेगावात, नांदतो अजी 'यामध्ये एकूण तीन संत जीवन मुक्त अवस्थेचे परमहंस श्रीसमर्थ लहानुजी महाराज, बाल्यावस्थेत







श्रीसंत सत्यदेव महाराज तसेच युगप्रवर्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आडकुजी महाराजांचे संतचरित्रकार पूज्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर महाराज, आद्यग्रामगीताचार्य यांच्या प्रथमताच लेखन केलेल्या 'राष्ट्रसंताचे गुरूदेव' अर्थात परमहंस श्रीसमर्थ सद्गुरू आडकुजी महाराज जीवन चरित्राला दिलेल्या प्रस्तावनेत लिहतात. 'कदाचित माझ्या सद्गुरूंनी काही चमत्कार केले असते तर मी बिलकुलही मानलेही नसते, परंतु ज्यांच्या राहण्यात, जगण्यात किंवा पाहण्यात काही मोहचं नव्हतां, भक्तांनी हजारो, लाखोंच्यां नोटा आणून त्यांच्या जवळ ठेवाव्यात, परंतु माझ्या श्रीगुरूदेवांनीं त्याला स्पर्श सुध्दा करू नये. अशी त्यांची वृत्ती होती, असे त्या माझ्या सद्गुरू चे जीवन होते. 'नंगे निःसंग बैठे, वैकुंठ पीठ माई,तनको सुखा रहे हो, जय हो, तुम्हारी जय हो, बरखेड वाले बाबा, जय हो, तुम्हारी जय हो!' मानवी जीवनात सद्गुरूचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एका भजनात लिहतात. 'सतगुरू नाम तुम्हारा, दिलसे पियारा, जो जपता है, जनम सुधारा'सब देवनका देव गुरू है! सब साधनका साध्य गुरू है! सब विदयाका ग्यान गुरू है! प्राचीन काळापासून गुरू परंपरेत वशिष्ट, विश्वामित्र, कश्यप, अत्रि, वाल्मिकी यांच्या सारखें मुख्य एकविस ऋषी होऊन गेलेत त्यांनी वेद, उपनिषदे, आरण्यके, रामायण, गीता, भागवत आदि विविध ग्रंथाचे शिक्षण दिले. त्यामुळे अनेक शिष्य निर्माण झाले. आजही ती गुरूपंरा एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धाकडे जात असतांनाच आळंदी सारख्या माऊलीच्यां दरबारात ज्ञानेश्वरीचे चिंतन प्रशिक्षण, देहू ला संत तुकाराम गाथेचे चिंतन आध्यात्मिक प्रशिक्षण, पैठण येथे संत एकनाथी भागवत चिंतन तर राष्ट्रसंताच्या गुरूकुंज आश्रम (मोझरी) येथे ग्रामगीता, सामुदायिक प्रार्थना व ध्यान चिंतन प्रशिक्षण, श्रीसंत शंकर महाराज संस्थान, पिंपळखुटा येथे वारकरी प्रशिक्षण चिंतन आजही दिल्या जाते. ग्रामगीता ग्रंथात म्हटल्याप्रमाणे 'आजचे छान छान बाल! उद्या तरुण कार्यकर्ते होतील! देशाचा गावांचा विकास करतील! यासाठी जीवनभर अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक पूज्य तुकारामदादा गीताचार्य, सुदामदादा, रामकृष्णदादा, रामटेकेगुरूजी, वेरूळकर गुरूजी उद्याची भावी पिढी घडविण्यासाठी युगग्रंथ ग्रामगीता प्रशिक्षण देत गेले. तेच ज्ञानेश्वरीचे शिक्षण ह.भ.प.राऊत महाराज आणि संत साधक मंडळी आळंदीत देत आहे.

या गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने हा मानवतेच्या तत्त्वज्ञानाचा ग्रामगीता विचार संदेश अधिका अधिक गाव, तालुका, जिल्हा, राज्य स्तरावर राज्या राज्यातून बहरलां पाहिजे त्यासाठी ''मित्रा ! ऐसा अभ्यास करी! धरोनि मार्ग -बोध अंतरी! मग दिसेल याच शरीरी!तो श्रीहरी व्यापला!'' ऐसा सेवकचि पाया जगाचा! गावाचा रत्ननिधीच तो साचा! अभ्यास करा सक्रिय अध्यात्माचा! याचसाठी! 'ऐसे लोक निर्माण करावे! तरीच उदया ये जग नवे! नांदेल ग्राम, विश्व, वैभवे! सर्वकाळ, तुकड्या म्हणे!!' हे सर्व सेवा कार्य परमहंस श्रीसमर्थ सद्गुरू आडकुजी महाराजांच्या आशीर्वादाने व प्रखर साधनेमुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी संत गाडगेबाबा त्या पदाला पोहोचले. आजही ती गुरू परंपरा चालत आहे. आजपर्यतं ही संतपरंपरा जोपासण्याचे कार्य श्रीसंत अच्युत महाराज, शंकर महाराज, गणपती महाराज यांच्या सारख्या शेकडो संतांनी चालविले. आज कलियुगात ती गोष्ट सहज साध्य होऊ शकतं नाही, त्यासाठी जो पर्यंत त्या कसोटीला उतरत नाही, तो पर्यंत सिद्द होऊ शकतं नाही, त्यासाठी हनुमंत रायाची दास्यभक्तीची गरज आहे. तो दास, सेवक, प्रचारक सेवेशिवाय प्राप्त होऊ शकतं नाही 'सेवेने अंगी सामर्थ्य येते! जे जे बोलाल ते ते होते! हस्ते परहस्ते होते! काम त्याचे!! आजही ही 'गुरूपुजा -महोत्सव' व्यायाम मंदिर, आखाड्यात, शाळा, महाविद्यालयात, गुरूकुल, संगीत विद्यामंदिरात अनेक ठिकाणी साजरी केली जाते. त्याचबरोबर आजही भक्ती मार्गातील अंभग -भजने शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात, किंवा लोकसंगीताच्या आपल्या गुरूकुल पध्दतीने भजन सम्राट अनुप जलोटाजी, पंडित सुरेश वाडकर, पंडित अजित कडकडे, अनुराधा पौडवाल, यांच्या सारखें शेकडो गायक -गायीका विद्यार्थ्यांना म्हणजेच आपल्या शिष्यांना घडविण्याचे कार्य करित आहे. त्यामध्ये ज्या विद्यार्थ्यांतं किंवा ज्या तरूणांत दास्य भक्ती आहे ज्या मुलांनमध्ये शिकण्याची वृत्ती आहे. तीच मुले, तीच व्यक्ती किंवा तेच विद्यार्थी आजही घडत आहेत.

शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण भारतात किंवा विदेशात तर शाळा, महाविद्यालयात हजारो लाखोंच्यां संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतू तिथे गुरूकुल पध्दतीने शिकवले जात नाहीत किंवा गुरू-शिष्यं परंपरा पाळली जात नाही. कारण आता जे शिक्षण आहे. त्यामुळे नौकरी मिळिवण्यासाठी ते शिक्षण घेण्याची प्रथा आरूढ झालेली आहे. परंतू खरोखरच आपल्याला काही तरी जीवनात मला घडायचेच आहे. मला काही तरी निर्माण करायचेच अशी निष्ठा जर प्रत्येक विद्यार्थ्याने अंगी बानली तर उच्च पदाला पोहोचू शकते. परंतू ''श्रध्दा लभते ज्ञानम!'' श्रध्देने ज्ञान प्राप्त होते. ज्यांची आपण घेत असलेल्या शिक्षणावर, संगीतावर, चौदा विद्या, चौसष्ट कलानवर त्यांच्या अभ्यासावर, श्रध्दाचं नसेल तर काहीही प्राप्ती होऊ नाही, प्रथम त्याची आपल्या जन्मदात्या आईवर, वडिलांवर व गुरूवर श्रध्दा असल्याशिवाय हे कार्य सर्वतास जाऊ शकत नाही.

तोच विद्यार्थी ते शिखर गाठू शकते. आपल्या समोर विज्ञानाच्या क्षेत्रात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ.श्री विजय भटकर, वसंत गोवारीकर, संत व साहित्यांचे क्षेत्रात दादा धर्माधिकारी, प्राचार्य राम शेवाळकर, आद्यग्रामगीताचार्य रामकृष्णदादा बेलूरकर, डॉ.यु.म.पठाण, संगीताच्या क्षेत्रात लता मंगेशकर, उषा मंगेशकर, कृष्णा शिंदे, विठ्ठल उमप, सुरेश वाडकर, वारकरी शास्त्रीय कीर्तन -प्रवचनाचे क्षेत्रात प्रवचनकार प्रा.मामासाहेब दांडेकर, धुंडा महाराज देगलूरकर, बाबा महाराज सातारकर, लक्ष्मणदास काळे महाराज, कन्हेरकर महाराज संगीताच्या क्षेत्रात श्री सुधीर फडके, राम लक्ष्मण, दत्ता डावजेकर, हृदयनाथ मंगेशकर, भजनाच्या क्षेत्रात मारोतराव कर्डीकर, रघुनाथ घावट, प्रकाश कथले, पुरी महाराज, मच्छिंद्रनाथ चव्हाण, रघुनाथ कर्डीकर, गोपाल सालोडकर यांच्या सारख्यानीं परिपूर्ण होऊन आपल्या आपल्या क्षेत्रात स्थान निर्माण केले आहे. काही लोक निर्माण करीत आहेत. याला कारण जे काही शिक्षण ध्यायचे त्यामध्ये त्यांनी कुचराई केली नाही, किंवा मुख्य विषय सोडून बाकीच्या विषयावर लक्ष केंद्रित केले नाही, फालतू वाईट व्यसन जळू दिलें नाहीं, अशी शेकडो त्या त्या क्षेत्रातील गुरूवर्य आजही एकाच गोष्टीचा ध्यास धरून आहे. अभ्यासात त्यांनी लक्ष घातले. तरच त्या पदावर पोहचू शकतो. ही गुरू-शिष्याची परंपरा आज वारकरी संप्रदायात चांगले प्रकारे सांभाळले जाते. कर्मयोगी संत गाडगेबाबा या परंपरेला फाटा देऊन फक्त पवित्र मनाने भक्ती करा, आणि कामातच राम पहा, हेच सेवा कार्याचा विचार ग्रामगीतेच्या माध्यमातून राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी 'प्रामाणिकपणे करणे काम! हेची आमुचे ईश्वर नाम!! -ग्रामगीता, सामुदायिक प्रार्थना, सामुदायिक ध्यान चिंतन नियमितपणे करणे, श्रध्दा पुर्वक ग्रामगीता, ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत, रामायण, गीता वर निष्ठा ठेवून काम करणे हीच खरी गुरू पूजा!




माणिकदास बेलूरकर
संत साहित्य अभ्यासक, श्रीक्षेत्र वरखेड तालुका तिवसा जिल्हा अमरावती मो.९४२००७६५७३

# गुरुजी... आता जगावं कसं? असत्याच्या काळात सत्याचा शोध

**गुरुजी सादर प्रणाम,**

आज गुरुपौर्णिमा. तुमचे चरण वंदन करावे, आशीर्वाद घ्यावा. तुम्ही आम्हाला माणूस म्हणून घडवले. 'सत्य बोल, प्रामाणिक राहा, अन्यायाला विरोध कर' हेच संस्कार दिले. पण गुरुजी, आज समाजात वावरताना काळीज तुटते. तुम्ही शिकवलेले तत्वज्ञान आणि आजूबाजूचे वास्तव यात जमीन-अस्मानाचा फरक आहे.

राजकारण आणि समाजकारण कोलमडले आहे. निवडणूक आली की भाऊ-भाऊ, बहीण-बहीण एकमेकांचे शत्रू होतात. जाती-धर्माच्या नावावर माणसे तोडली जातात. तत्वं, विचार, आदर्श हे फक्त भाषणापुरते उरले. पदासाठी, खुर्चीसाठी नीती-मुल्ये गहाण ठेवली जात आहेत. 'जनसेवा' हा शब्दच इतिहासजमा झाला आहे.





प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराचा विळखा आहे. शिक्षण क्षेत्र - ज्ञानाचे मंदिर असलेल्या शाळा-कॉलेजमध्ये प्रवेशासाठी डोनेशन, नोकरीसाठी सिफारस, पदोन्नतीसाठी सेटिंग. शिक्षकाला पगाराची चिंता आणि विद्यार्थ्याला गुणवत्तेची चिंता. शिकवणीच्या बाजारात शिक्षण विकले जात आहे. आरोग्य क्षेत्र - आजारात माणूस देवाला शरण जातो. पण दवाखान्यात आधी बिल आणि नंतर उपचार. अनावश्यक तपासण्या, औषधांवरील कमिशन. गरीब रुग्ण उपचाराआधीच हतबल होतो. न्याय व्यवस्था - 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य भिंतीवरच राहिले. कोर्टात तारीख पे तारीख. गरीबाला न्याय मिळेपर्यंत तो आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या खचून जातो. सत्याला आज आई-बाप नाही राहिले. प्रशासन - बांद्यापासून तांड्यापर्यंत प्रत्येक छोट्या मोठ्या कामासाठी 'खर्चा'. फाईल पुढे सरकवायला, सहीसाठी, परवानगीसाठी हात पुढे. प्रामाणिक अधिकारी आणि कर्मचारी या व्यवस्थेत गुदमरतो आहे. शेती आणि व्यापार - शेतकऱ्याच्या कर्जमाफी, अनुदानात दलाली. बाजारात भेसळ, खोटी मापे, नफ्यासाठी माणसाच्या जीवाशी खेळ. माध्यम - टीआरपीसाठी खोट्या बातम्या, अफवा, द्वेष. सत्य शोधायला गेलं तर ते हरवून बसलंय. गुरुजी, तुम्ही महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांचे विचार आम्हाला दिले. त्यांनी सत्यासाठी आयुष्य पणाला लावले. पण आज प्रत्यक्ष जगात वावरताना असत्यच असत्य दिसते. रस्त्याचा निधी खाल्ला जातो. शाळेच्या इमारतीचा निधी अर्धा होतो. मंदिराच्या दानपेटीवरही वाईट नजर असते. मग आम्ही जगावं कसं? इमानदार राहिलो तर जगणं कठीण. आणि भ्रष्टाचार केला तर मन मरतं. दोन्ही बाजूने कोंडी आहे. कधी कधी जीवनाच त्याग करावासा वाटतो.

पण गुरुजी, तुम्हीच शिकवले - 'अंधाराला शिव्या घालण्यापेक्षा एक दिवा लावा'. म्हणून अजूनही आशा आहे. कदाचित एक माणूस संपूर्ण व्यवस्था बदलू शकत नाही. पण एक घर तरी प्रामाणिक ठेवू शकतो. एक मत तरी विकणार नाही. एक सही तरी लाच न घेता करू शकतो.

सत्य जरी अनाथ झाले असले तरी ते मेले नाही. ते फक्त थकले आहे. ते पुन्हा उभे करण्यासाठी तुमच्यासारख्या गुरुंची आणि आमच्यासारख्या तरुणांची गरज आहे. शेवटी एवढेच - या कोलमडलेल्या व्यवस्थेतही जगण्याचे बळ द्या गुरुजी. असत्याच्या गर्दीत सत्याचा आवाज होण्याची हिंमत द्या.

**तुमचा ऋणी शिष्य**



शेषराव गोपाळराव कडू
वरुड, जि.अमरावती
मो.नं.९९२३९८८७३४

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# पुणे विद्यापीठात बनावट पदवीचे रॅकेट उघड : रिक्षाचालकाने केला भांडाफोड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**पुणे** – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये बनावट पदवीचे एक धक्कादायक रॅकेट सक्रिय असल्याचे उघडकीस आले असून यामुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागातील एका सहाय्यक कक्षाधिकाऱ्याने रिक्षाचालकाच्या मुलाला चक्क कोणतीही परीक्षा न देता तीन लाख रुपयांच्या बदल्यात बीकॉमची पदवी देण्याचे ओकाचा दावा मिळवून काणचे सतर्क रिक्षाचालकाने पुराव्यांसह तक्रार दिल्यानंतर आता विद्यापीठ प्रशासनाने चौकशीसाठी सत्यशोधन समिती नियुक्त केली आहे. या प्रकरणाच्या रिक्षाचालक महेश कदम हे मुलगा साहील कदम याच्या उच्च शिक्षणासंदर्भात चौकशी करण्यासाठी पुणे विद्यापीठात गेले होते. मुखेकर व त्यांच्या ३ ते ४ सहकाऱ्यांनी कदम यांना मुलाला कोणत्याही कॉलेजमध्ये प्रवेश न घेता किंवा कोणतीही परीक्षा न देता थेट बीकॉमची डिग्री मिळवून देण्याचे आश्वासन दिले. जुन्या नावाने दिली प्रमाणपत्रे जेव्हा कदम यांना ही प्रमाणपत्रे दाखवण्यात आली, तेव्हा त्यांना या संपूर्ण व्यवहाराबाबत संशय आला.

# अमेरिका आणि सौदी अरेबियाचे आता इराकमध्ये हवाई हल्ले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**इराण** – अमेरिका आणि सौदी अरेबियाने इराकमधील इराण–समर्थित मिलिशियाच्या तळांवर हवाई हल्ले केले आहेत. अमेरिकन लष्कराच्या म्हणण्यानुसार, हे तळ अमेरिकी सैन्य आणि सौदी अरेबियाच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ला करण्याच्या तयारीत होते. इराकी पॉप्युलर मोबिलायझेशन फोर्सेसने (पीएमएफ) दावा केला आहे की, या हल्ल्यांमध्ये त्यांचे आठ सैनिक ठार झाले आणि इतर अनेक जखमी झाले. हल्ल्यांनंतर काही तासांतच, इराणने प्रत्युत्तर म्हणून अनेक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. यूएस सेंट्रल कमांडच्या (सेंटकॉम) मते, ही क्षेपणास्त्रे जॉर्डनमधील एका अमेरिकी लष्करी तळाला लक्ष्य करत होती, परंतु ती सर्व वाटेतच रोखण्यात आली. दरम्यान, सौदी अरेबियाने आपल्या पूर्व प्रांतातील तेल प्रकल्पांच्या दिशेने जाणारे अनेक ड्रोन पाडल्याचा दावा केला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये तीन तेलवाहू जहाजे रोखल्याचा दावा केला आहे. इराण–समर्थित मिलिशिया कोण आहेत? २००३ मध्ये अमेरिकेने इराकवर केलेल्या आक्रमणानंतर, इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स आणि त्याच्या कुड्स फोर्सच्या पाठिंब्याने अनेक शिया सशस्त्र गट उदयास आले.

# आषाढी एकादशीची औचित्य साधून

## प्रभात हायस्कूल, पुसला उत्साहात दिंडीचे आयोजन





(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – दि.२५ जुलै रोज शनिवारला आषाढी एकादशीची औचित्य साधून प्रभात हायस्कूल, पुसला येथील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्साहात दिंडीचे आयोजन केली. ही दिंडी प्रभात हायस्कूल पासून निघून गावातील विठ्ठल मंदिरापर्यंत पोहोचली.

विद्यार्थ्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात विठ्ठल रुक्मिणीच्या जयघोषित व अभंग गात भक्तीमय वातावरण तयार केले. विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे महत्त्व सांगणारे फलक व झेंडे हातात घेतले होते. विठ्ठल मंदिरात पोहोचल्यानंतर आरती करण्यात आली आणि सर्वांना मंदिराच्या वतीने फराळ देण्यात आला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक सांस्कृतिक व नैतिक मूल्यांची जपणूक करण्याचे संदेश देण्यात आला. या दिंडीची गावकऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले या उपक्रमाकरिता शाळेचे मुख्याध्यापक व्ही.ए.खेरडे, फुटाणे, खेरडे, खडककर, सराटकर, सिद्धार्थ डोंगरे, देवघरे तसेच प्रकाश बेंडे व ज्ञानेश्वर वाघाडे यांची मोलाची सहकार्य लाभले.

# शेंदुरजनाघाट परिसरात जंभेरी रोपाची लागवडीची लगबग

## जंबेरी एलीमो व रंगपुर या रोपा पासुन संत्रा मोसंबी व लिंबू कलमाची निर्मिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – सातपुडयाच्या पायथ्याशी मध्यप्रदेशाच्या सीमेजवळ वसलेले शेंदुरजनाघाट हे गाव. संत्रासह मोसंबी, लिंबू आदींच्या कलमांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रसह परपांतातही प्रसिद्ध आहे.

सध्या या भागात लिंबूवर्गीय कलमांच्या निर्मीतीकरिता जंबेरी रोपाची लागवडीची लगबग दिसून येत आहे.

जंभेरी, एलीमो व रंगपूर रोपाची लागवड करुन याद्वारे संत्रा, मोसंबी, लिंबू या झाडांच्या कलमांची निर्मिती करण्यात येते. जंबेरी रोपाच्या लागवडीचे काम सध्या जोरात सरु आहे शेंदुरजनाघाट परिसरात निर्माण होणाऱ्या संत्रा आणि अन्य कलमांना महाराष्ट्रातील संत्रा उत्पादक क्षेत्रासह देशातील राजस्थान मध्यप्रदेश आणि अन्य प्रांताताही मागणी आहे संत्रा मोसंबी कलमांच्या खरेदीसाठी येथे शेतकऱ्यांची वदर्ळ पाहायला मिळत आहे. ही संत्रा व अन्य कलमांची मोठी बाजारपेठ म्हणुन प्रसिद्ध आहे.

या कलमांच्या निर्मितीसाठी जुलै ऑगस्ट, महिन्यात जंबेरी रोपाची लागवड करावी लागते. त्यापासून संत्रा, मोसंबी, लिंबु या झाडांच्या कलमा तयार केल्या जातात जंबीरी रोप तयार करण्यासाठी ऑक्टोंबर महिन्यात ईडी लिंबुच्या बियाची वाफा पद्धतीने किंवा बेड पद्धतीने लागवड करण्यात येते.

त्यापासून जंबेरी नामांक रोपटे तयार होते ते रोपटे त्या जाग्यावरुन खोदुन दुसऱ्या ठिकाणी लावल्याचे काम सध्या जोमात सरु असताना दिसून येतात. या परिसरात संत्रा पिक आणि संत्रा मोसंबी कलमांची निर्मिती हे अर्थकारणाचे प्रमुख माध्यमातून सर्व व्यवहार चालतो संत्रा व संत्रा कलमांना चांगले दर मिळाले तर या भागातील शेतकरी शेतमजुरांचे आर्थिक वर्ष चांगले जाते.

त्याच आधारावर परिसरातील तिवसाघाट, सातनुर, वाई, पुसली, मालखेड, धनोडी, पुसला, टेंभुरखेडा, मलकापूर या भागात जंभेरी रोपाच्या लागवडीला जोमाने सुरुवात झाल्याचे दिसुन येत आहे.

“ ईडी लिंबूच्या झाडावरील परिपक्व झालेले लिंबू तोडून त्यातील बी काढून ते सुकू घालून त्या बियाची ऑक्टोंबर ते नोव्हेंबर महिन्यात वाफे किंवा बेड पद्धतीने तयार करून त्यामध्ये लागवड केल्या जाते व ते रोप १२ ते १५ इंचाचे झाल्यावर ते तेथून खोदून आणून कलमा लागवडीच्या तयार केलेल्या जागी आणुन पावसाळा सुरू झाला की जुलै महिन्यात लागवड केली जाते, अशी प्रतिक्रिया कलमा उत्पादक शेतकरी तुळशिराम वंजारी यांनी व्यक्त केली.

# कठोर कारवाई नको! दिल्ली आंदोलनप्रकरणी ‘सर्वोच्च’ दिलासा : १८ वर्षांखालील मुलांची तत्काळ सुटका करण्याचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** - नीट-यूजी पेपरफुटीप्रकरणी झालेल्या विद्यार्थी आंदोलनप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी आंदोलकांना मोठा दिलासा दिला. कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही अशा आंदोलकांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाऊ नये आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या १८ वर्षांखालील आंदोलकांची त्वरित सुटका करावी, असे आदेश न्यायालयाने दिले.

या संदर्भात दिल्ली, महाराष्ट्र, बिहार, केरळ, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

जंतरमंतरवरील आंदोलना-दरम्यान पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर अत्याचार आणि बळाचा वापर करण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या अनेक याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. शांततापूर्ण मार्गाने होत असलेले आंदोलन हा लोकशाहीचा अभिन्न भाग आहे, असे सर्वोच्च न्यायालय म्हणाले. देशभरात विद्यार्थी आंदोलनांच्या दरम्यान झालेल्या घटनांची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता न्यायालयाने बोलून दाखवली. आंदोलनादरम्यान अतिरिक्त बळाचा वापर झाला असल्यास, नियमांचे उल्लंघन झाले असल्यास त्याबद्दलची जबाबदारी निश्चित व्हायला हवी, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सुनावणीदरम्यान खंडपीठाने नमूद केले की, ज्यांनी कायद्याचे उल्लंघन केले त्यांना नक्कीच जबाबदार धरले पाहिजे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२४/२०२६** **ने.ता.२९/०८/२०२६**

**अर्जदार :-**

गोविंदा गुलाबराव देशमुख
वय अं.६० वर्ष, धंदा-शेती
रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत गुलाब दौलतराव देशमुख, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२५/२०२६** **ने.ता.३१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती मीना दिलीपराव बोंडे, वय अं.६१ वर्ष, धंदा-घरकाम
२) रोशन दिलीपराव बोंडे, वय अं.३९ वर्ष, धंदा-मजुरी
क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दिलीप रामरावजी बोंडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७४/२०२६** **ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) कलावती तुकाराम वाहणे, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम
२) प्रदीप तुकाराम वाहणे, वय अं.३६ वर्ष, धंदा- मजुरी
अर्जदार क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही:-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत तुकाराम जागो वाहणे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६१६/२०२६** **ने.ता.२८/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१)पुरुषोत्तम सदाशिवराव टाकरखेडे, वय अं.६३ वर्ष, धंदा-शेती
२) विजय सदाशिव टाकरखेडे, वय अं.५९ वर्ष, धंदा- शेती
अर्जदार क्र.१ व रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
अर्जदार क्र.२ व रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही:-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत अहिल्याबाई सदाशिवराव टाकरखेडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# कामगिरी सुधारा, अन्यथा बाजूला व्हा! निष्क्रिय मंत्र्यांना एकनाथ शिंदेंचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जनतेची कामे करण्याला प्राधान्य देण्याऐवजी काही मंत्री वैयक्तिक हितसंबंध जोपसण्यात मग्न आहेत. अशा मंत्र्यांनी लोकाभिमुख होऊन आपल्या कामगिरीत सुधारणा करावी, अन्यथा अशांना बाजूला करून पक्षकार्यासाठी मोकळे केले जाईल, अशा शब्दात एकनाथ मंगळवारी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पक्षातील निष्क्रिय मंत्र्यांवर नाराजी व्यक्त केली. सुमार कामगिरी असलेल्या मंत्र्यांना कामात सुधारणा करण्यासाठी शिंदे यांनी काही महिन्यांची मुदत दिल्याचे समजते. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर शिंदे यांनी मंगळवारी मंत्रालयात पक्षाच्या मंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीला शिंदे यांचे ९ कॅबिनेट आणि २ राज्यमंत्री उपस्थित होते. यावेळी मंत्र्यांच्या कामगिरीची झाडाझडती घेताना शिंदे यांनी



मंत्र्यांच्या कामगिरीवर असमाधान व्यक्त केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्याबाबत शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे समजते. अनेक मंत्र्यांनी स्वत:ला आपापल्या मतदारसंघापुरती बांधून घेतले आहे. मंत्री मतदारसंघाच्या पलीकडे बघायला तयार नाहीत. पालकमंत्री म्हणून जिल्ह्याचे दौरे, शासकीय बैठका होत नाहीत.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६१३/२०२६ ने.ता.२८/०८/२०२६

अर्जदार :-

१) प्रमोद महादेवराव माळोदे, वय अं.४५ वर्ष, धंदा-शेती

२) नंदा दिनेश काळे, वय अं.४६ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत महादेव नारायण माळोदे व शोभा महादेवराव माळोदे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६१९/२०२६ ने.ता.२८/०८/२०२६

अर्जदार :-

१) शेख करीम शेख रहीम, वय अं.६८ वर्ष, धंदा-मजुरी

२) रुखसाना बानो शेख युनुस, वय अं.६५ वर्ष, धंदा- घरकाम

३) कुरेशा बानो शेख रहीम, वय अं.५९ वर्ष, धंदा- घरकाम

४) रेहाना बी शेख वहीद, वय अं.५१ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ ते ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत शेख रहीम शेख लाल व जहुरबी शेख रहीम, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.५८९/२०२६ ने.ता.२१/०८/२०२६

अर्जदार :-

१) शरिफा बी चांद शाह, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम

२) उस्मान शाह चांद शाह, वय अं.५२ वर्ष, धंदा- मजुरी

३) वहिदा बी युसुफ शाह, वय अं.५२ वर्ष, धंदा- घरकाम

४) अर्शीद शाह युसुफ शाह, वय अं.२७ वर्ष, धंदा- मजुरी

५) अयान शाह युसुफ शाह, वय अं.२२ वर्ष, धंदा- मजुरी

६) रेश्मा शकील शाह, वय अं.३२ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ ते ५ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

अर्जदार क्र.६ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ... कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत चांदशहा नुरुशहा, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६१७/२०२६ ने.ता.२७/०८/२०२६

अर्जदार :-

१) नंदा मधुकर मांडळे, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम

२) शंभु मधुकर मांडळे, वय अं.३० वर्ष, धंदा- शेती

अर्जदार क्र.१ व २ रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत मधुकर रामचंद्र मांडळे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२७/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

# व्हिडीओचा नव्हे, 'दिल का अँगल' बदला : प्रियांकांचा मोदींना खोचक सल्ला, परीक्षा सुधारणा विधेयकावर चर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली**– सलग सहा दिवसांच्या कोंडीनंतर मंगळवारी लोकसभेत 'सार्वजनिक परीक्षा (अयोग्य मार्गांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६'वर चर्चा सुरू झाली. एकीकडे सत्ताधाऱ्यांनी हे विधेयक विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार असल्याचे म्हटले, तर दुसरीकडे विरोधकांनी आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमारावरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. पंतप्रधानांनी वापर व्हिडीओचा नाही तर मनाचा अँगल बदलण्याची गरज आहे, असा खोचक सल्ला काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी दिला. प्रियांका यांनी, आपले विद्यार्थी दहशतावादी आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्याचे, लाठीचार्जचे आणि पॅलेट गनचा करण्याचे आदेश कुणी दिले, असा प्रश्नही प्रियंका गांधीनी उपस्थित केला. त्या संदर्भात त्या म्हणाल्या की, सभागृहात विरोधकांवर आरोप करणे आणि पोकळ राजकारण करणे आता चालणार नाही. मोदींनी वेगवेगळ्या कॅमेरा अँगलने व्हिडिओ बनवून तरुणांची मने जिंकता येणार नाहीत. यासाठी त्यांना सत्याच्या मार्गावर चालावे लागेल. सरकारवर राम मंदिर देणग्यांची चोरी, मतांची चोरी आणि शेतकरयांच्या जमिनींच्या चोरीचा आरोप करत, 'सगळ्यात मोठी चोरी ही देशातील तरुणांच्या स्वप्नांची झाली आहे,' असे त्या म्हणाल्या.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६१४/२०२६ ने.ता.२७/०८/२०२६

अर्जदार :-

१) सुमन नानासाहेब मांडळे, वय अं.८३ वर्ष, धंदा-घरकाम

२) श्याम नानासाहेब मांडळे, वय अं.५७ वर्ष, धंदा- शेती

३) नरेंद्र नानासाहेब मांडळे, वय अं.५४ वर्ष, धंदा- शेती

४) श्रीकांत नानासाहेब मांडळे, वय अं.४९ वर्ष, धंदा- शेती

अर्जदार क्र.१ ते ४ रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नाना रामचंद्र मांडळे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२७/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वी.वी.राजुरकर, २ रे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६१८/२०२६ ने.ता.२७/०८/२०२६

अर्जदार :-

१) संजय नीलकंठ फुटाणे, वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती

२) सरोज रामेश्वर वहोंकर, वय अं.५६ वर्ष, धंदा- घरकाम

३) संगीता विलास ढोरे, वय अं.५४ वर्ष, धंदा- घरकाम

४) प्रतिभा हरीश्चंद्र गहुकर, वय अं.४९ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१, रा.तिवसाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.२ रा.खैरगाव, ता.नरखेड, जि.नागपूर, अर्जदार क्र.३ रा.धनोडी, ता.वरुड, अर्जदार क्र.४ रा.हिवरखेड, ता.मोर्शी

... विरुध्द ... कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नीलकंठ लक्ष्मण फुटाणे व मयत शकुंतला नीळकंठ फुटाणे, रा.तिवसा घाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२७/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वी.वी.राजुरकर, २ रे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६१५/२०२६ ने.ता.२८/०८/२०२६

अर्जदार :-

१) विजया जनार्दन पाटील, वय अं.६१ वर्ष, धंदा-घरकाम

२) अर्चना भोजराज चव्हाण, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम

३) आम्रपाली विजय रामटेके, वय अं.३७ वर्ष, धंदा- घरकाम

४) शिल्पा सुनिल तागडे, वय अं.३२ वर्ष, धंदा- घरकाम

५) पुर्वा जनार्दन पाटील, वय अं.२७ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१, ४ व ५ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.२ रा.वडली, पो.डिग्रस, ता.काटोल, जि.नागपूर, अर्जदार क्र.३ रा.यवतमाळ, ता.जि.यवतमाळ

... विरुध्द ... कोणी नाही:- गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत हरबाजी तिमाजी पाटील व अंजनाबाई हरबाजी पाटील, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्रं.६०६/२०२६ ने.ता.२५/०८/२०२६

अर्जदार :-

१) अरुण महादेव मनोहरे, वय अं.६५ वर्ष, धंदा-गृहिणी

२) कु.स्वरा सिध्दार्थ राऊत, वय अं.१३ वर्ष, धंदा- शिक्षण

३) कु.देवांश सिध्दार्थ राऊत, वय अं.११ वर्ष, धंदा- शिक्षण

४) श्रीमती शांता गुलाबराव राऊत, वय अं.७९ वर्ष,धंदा- गृहिणी

सर्व रा.वार्ड क्र.१, बहादा, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सिध्दार्थ गुलाबराव राऊत, रा.बहादा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२५/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २१/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड




# एनडीपीएस प्रकरणासाठी पुण्यात विशेष न्यायालय

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चार न्यायालयांचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मादक द्रव्ये आणि मादक पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस) अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्यासाठी पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.



राज्यात सध्या एनडीपीएस कायद्यानुसार सुमारे ३० हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. उच्च न्यायालयाने पुणे येथील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेता, विशेष न्यायालय स्थापन करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार आज झालेल्या बैठकीत विशेष न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यास आवश्यक आठ पदांना मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश, लघुलेखक श्रेणी-एक, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपीक प्रत्येकी एक आणि कनिष्ठ लिपीक दोन अशा पदांचा समावेश आहे.

कर्जत येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय कर्जत, जामखेड तालुक्यातील नागरिकांना न्यायसेवा अधिक सुलभ तसेच जलद उपलब्ध करून देण्यासाठी कर्जत येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रस्तावित न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्याचे एक पद, शासकीय अभियोक्ता कार्यालयासह सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची २२ पदे उपलब्ध करून देण्यात येतील.

# शाळा, महाविद्यालयांत व्यसनमुक्ती समिती : राज्य सरकारचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विद्यार्थ्यांमधील अमली पदार्थांच्या सेवनाला आळा घालण्याच्या मोहिमेचा एक भाग म्हणून राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'व्यसनमुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समित्या' स्थापन करणार असल्याची माहिती राज्यमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मंगळवारी दिली.

व्यसनमुक्ती जनजागृती मोहिमेसाठी गठित उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष लोढा म्हणाले, 'ड्रग्ज-मुक्त मुंबई' या मोहिमेचे प्रारूप आता राज्यभरात राबवले जाणार



आहे. या समित्या अमली पदार्थांच्या दुष्परिणामांवर नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करतील, विद्यार्थ्यांमधील वर्तनातील बदल सुरुवातीच्या टप्प्यात ओळखून त्यांचे समुपदेशन करतील, पालक आणि शिक्षकांमध्ये समन्वय साधतील, तसेच आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडे उपचारासाठी पाठवतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

# नीट पेपरफुटी आंदोलनातील विद्यार्थ्यांना राज्य सरकारचा दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – देशभरात गाजलेला छएएढ पेपरफुटी प्रकरणाविरोधातील आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवर सुरू असलेली पोलीस कारवाई संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. एकीकडे गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या आंदोलकांना सोडून देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने सरकारला दिले असताना महाराष्ट्र



सरकारने या संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. छएएढ पेपरफुटी प्रकरणाविरोधातील आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवरील गुन्हे तातडीने मागे घेण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस प्रशासनाला आदेश दिले आहेत. त्यामुळे आंदोलनातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यार्थी आंदोलनातील गुन्हे मागे घेणार, मुख्यमंत्री फडणवीस यांचे गृह विभागाला निर्देश दिल्लीतील जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पक्षाच्या (उगझ) नेतृत्वाखाली उभं राहिलेल्या नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनात हिंसाचाराच्या घटना घडल्याचा प्रकार समोर आला होता. यानंतर या प्रकरणाचे लोण देशभरासह महाराष्ट्रात देखील पसरलं होतं. दरम्यान या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबई, पुणे आणि नागपूरसह इतरत्र आंदोलन करण्यात आले होते. यावेळी पेपरफुटी आणि पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीचार्ज विरोधात निदर्शने करत विरोध करण्यात आला होता. या प्रकरणांमध्ये, पोलिसांनी आंदोलकांवर प्रामुख्याने बेकायदेशीर जमाव जमवण्याशी संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला होता.

# पंढरीत पुराचा विळखा! चंद्रभागा दुथडी भरून वाहू लागली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पंढरपूर** – पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी आणि वीर धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने भीमा-चंद्रभागा नदीला पूर आला आहे.

मंगळवारी (२८ जुलै) उजनी धरणातून सोडलेले पाणी पंढरपुरात दाखल होताच चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहू लागली. नदीची पातळी झपाट्याने वाढल्याने पंढरपूरातील ऐतिहासिक जुना दगडी पूल आणि तालुक्यातील नदीवरील आठही बंधारे पाण्याखाली गेले आहेत. उजनी



धरणातून सुमारे ६१ हजार क्युसेक, तर वीर धरणातून जवळपास ५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. या वाढलेल्या प्रवाहामुळे भीमा नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून नदीकाठच्या परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

# विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पोलिसांवर दगडफेक करणाऱ्यांना सोडू नका! : मंत्री गिरीश महाजन

## शाळा-कॉलेजशी दूरचा संबंध नसलेल्यांची घुसखोरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा राजकीय फायदा उठवण्यासाठी काही पक्षांचे कार्यकर्ते आणि गुंड आंदोलनात घुसून हुल्लडबाजी करत असल्याचा गंभीर आरोप राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे. 'आंदोलनात सहभागी असलेल्या खऱ्या विद्यार्थ्यांबाबत गृहखाते नक्कीच सकारात्मक निर्णय घेईल. मात्र, पोलिसांवर दगडफेक करणारे, वाहनांची तोडफफोड करणारे आणि दंगा-मस्ती करणाऱ्या उपद्रवी घटकांना



कोणत्याही परिस्थितीत सोडू नका,' अशी भूमिका महाजन यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना मांडली. महाजन म्हणाले की, 'काही राजकीय पक्षांकडून विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी केला जात आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे हाच या घुसखोरांचा मुख्य हेतू होता.

त्यामुळे अशा हुल्लडबाजांवर कठोर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे.' या वेळी गिरीश महाजन यांनी ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. 'राजकारणात आपण कुठेतरी थांबले पाहिजे. स्मशानात जाईपर्यंत मीच; उठायला जमत नाही, बसायला जमत नाही, तरीही सर्व ठिकाणी 'मीच' ही भूमिका जनतेला अजिबात आवडत नाही. प्रत्येकाने योग्य वेळी थांबणे गरजेचे असते,' असा सल्ला त्यांनी खडसेंना दिला.







